आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० जानेवारी २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज राष्ट्रपतींच्या उपस्थितीत समारोप

- लिंगभाव समानता आणि महिला सबलीकरण हे भारताच्या परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांचे अविभाज्य घटक असल्याचं परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांचं प्रतिपादन

- महाकुंभमेळ्यानिमित्त आकाशवाणीची विशेष वाहिनी ‘कुंभवाणी’ चं लोकार्पण.

- छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात १३ माओवाद्यांची शरणागती

**आणि**

- हिमालयीन प्रदेशात पुढचे दोन दिवस थंडीची लाट कायम राहील असा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज.

**<><><><><>**

१८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज शेवटचा दिवस असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दुपारी समारोपाच्या अधिवेशनाला संबोधित करतील. त्यासाठी राष्ट्रपती दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी भुवनेश्वर इथं काल पोहोचल्या. या संमेलनाला ७५ देशांतून आलेले सुमारे ६ हजार प्रवासी भारतीय सहभागी झाले आहेत. त्यातल्या १७ जणांना, विविध क्षेत्रात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल, राष्ट्रपतींच्या हस्ते, 'प्रवासी भारतीय सन्मान' प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीवरुन होणार असून त्यामुळे दुपारी ३ वाजता

आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज दोन वाजून पन्नास मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

लिंगभाव समानता आणि महिला सबलीकरण हे भारताच्या परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांचे अविभाज्य घटक असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी आज केलं. भुवनेश्वरमध्ये सुरू असलेल्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या चौथ्या दिवसाच्या अध्यक्षपदाच्या भाषणात ते बोलत होते. डायस्पोरा दिवस - महिलांचं नेतृत्व आणि प्रभाव या संकल्पनेवर आधारित सत्राला संबोधित करताना जयशंकर म्हणाले की, सामाजिक रचनेत लिंगावर आधारित भेदभाव हा कौटुंबिक स्तरावर सुरू होतो आणि त्याचे पडसाद आरोग्य, पोषण आणि शिक्षण या मूलभूत संसाधनांच्या वाटपावरही उमटतात, असं जयशंकर म्हणाले. या सत्रात आव्हानांना तोंड देत जागतिक स्तरावर कर्तृत्व गाजवणाऱ्या महिला नेत्यांच्या कामगिरीचाही गौरव करण्यात आला.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आकाशवाणीच्या 'कुंभवाणी' वाहिनीचं लोकार्पण आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते प्रयागराज इथे झालं. महाकुंभ मेळा हा उत्सव जाती धर्मापलिकडे जाऊन एकतेचा संदेश देतो असं ते यावेळी म्हणाले. याच कार्यक्रमात त्यांनी 'कुंभमंगल धून'चं देखील उद्घाटन केलं. प्रसारभारतीचे अध्यक्ष डॉ. नवनीतकुमार सहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, दूरदर्शनच्या

महासंचालक कांचन प्रसाद, तसंच आकाशवाणीच्या महांचालक डॉ. प्रज्ञा पालिवाल आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. डॉ सहगल यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट... सहगल**

या आकाशवाणी वाहिनीवरून, आजपासून २६ फेब्रुवारी पर्यन्त महाकुंभमध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमावर आधारित अनेक कार्यक्रम प्रसारित करण्यात येतील. सकाळी ५ वाजून ५५ मिनिटांपासून रात्री १० वाजून ५ मिनिटांपर्यंत, या वाहिनीचं प्रसारण सुरू राहील. ही एफ एम वाहिनी १०३ पूर्णांक ५ अंश मेगा हर्टझवर, न्यूज ऑन ए आय आर या ॲप तसंच वेव्ह्ज ओ टी टी वर ऐकता येईल.

**<><><><>**

मेक इन इंडिया योजनेंतर्गत केंद्र सरकार खासगी कंपन्यांच्या सहकार्याने रेल्वेगाड्यांच्या चाकांची निर्मिती करणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली. तामिळनाडूमध्ये तिरुवल्लूर इथे दोन कंपन्यांच्या चाक निर्मिती विभागांना भेट दिल्यानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. सध्या रेल्वेला ८० हजारांहून अधिक उच्च शक्तीच्या चाकांची गरज आहे. त्यामुळे पुढच्या वर्षीपासून या निर्मितीला सुरुवात होईल. या चाकांचा वापर देशांतर्गत रेल्वे गाड्यांसाठी केला जाईल, तसंच इतर देशांमध्येही त्याची निर्यात केली जाईल, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज जारी झाली असून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १७ जानेवारीपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येतील. तर २० जानेवारी पर्यंत उमेदवारी अर्ज मागं घेता येतील. या

विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी, भाजप आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात १३ माओवाद्यांनी पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. या माओवाद्यांवर एकूण १३ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपये देण्यात आले.

**<><><><><>**

भारतीय छात्र सेना-NCC चे महासंचालक लेफ्टनंट जनरल गुरबीरपाल सिंह यांनी नवी दिल्लीत कल्पना आणि आणि नवोन्मेष स्पर्धेचं आज उद्घाटन केलं. हा मंच युवा वर्गाला त्यांचे विचार आणि नवीन कल्पना मांडण्याची संधी देत असल्याचं सिंह यांनी सांगितलं. एनसीसीतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या विविध शिबिरांमधून तज्ज्ञांकडून छात्रांना मार्गदर्शन केलं आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत केंद्रीय विद्यालयांच्या ३४ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा २०२३-२४ ची पारितोषिकं आज केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील. देशभरातून १५० केंद्रीय विद्यालयं या स्पर्धेत सहभागी झाली होती.

**<><><><><>**

'विकसित भारत युवा नेतृत्व संवाद २०२५ नवी दिल्लीत भारत मंडपम इथे आजपासून सुरुवात होत आहे. विकसित भारताच्या निर्माणाकरिता, तरुणांना नाविन्यपूर्ण संकल्पना सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळवून द्यावं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. देशभरातून सुमारे ३० लाख युवक युवतींनी यात सहभाग नोंदवला असून आजच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी एकंदर तीन हजार युवक युवतींची निवड करण्यात आली आहे. विकसित भारताशी निगडीत विषयांवर सादरीकरण आणि स्पर्धांमध्ये हे युवा सहभागी होतील.

**<><><><><>**

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघामध्ये तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला आज सुरुवात झाली. मालिकेतला पहिला सामना राजकोट इथं खेळला जात असून कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या अनुपस्थितीत, भारतीय संघाचं नेतृत्व स्मृति मंधना करत आहे. आयर्लंडनं नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा आयर्लंडनं ३७ व्या षटकात ४ बाद १६८ इतक्या धावा केल्या आहेत.

**<><><><><>**

पुरुष हॉकी इंडिया लीग मध्ये श्राची राह बंगाल टायगर्सचा सामना आज तामिळनाडू ड्रॅगन्सशी होणार आहे. ओडिशातल्या राऊरकेला इथं होणारा सामन्याला रात्री सव्वा आठ वाजता सुरुवात होईल.

दरम्यान, काल झालेल्या सामन्यांमध्ये वेदांत कलिंगा लान्सर्सने गोनासिकाचा २-१ असा पराभव केला. अँटोइन किनाला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. या

विजयासह, लान्सर्स सात गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर असून गोनासिका चार गुणांसह सातव्या स्थानी आहे.

**<><><><>**

क्वालालंपूर इथं मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताचा चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी जोडीची लढत मलेशियाच्या ओंग येव सिन आणि टियो ई यी यांच्याशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी सुरू होईल.

याआधीच्या सामन्यात भारताच्या याच जोडीनं मलेशियाच्या अयूब अझ्रियन आणि तान वी कियोंग यांना पराभूत केलं होतं.

**<><><><>**

गुवाहाटी इथल्या इंदिरा गांधी मैदानावर सुरू असलेल्या इंडियन सुपर लीग फुटबॉल स्पर्धेत नॉर्थ ईस्ट युनायटेड संघाचा सामना आज पंजाब एफसी संघाशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल. काल झालेल्या सामन्यात ओदिशा एफसी या संघाने चेन्नईन एफसी सोबत २-२अशी बरोबरी साधली होती.

**<><><><>**

देशात अनेक राज्यांत थंडीची लाट आणि घनदाट धुक्याची चादर कायम आहे. राजधानी नवी दिल्ली आणि एनसीआर परिसरात दाट धुक्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झालं आहे. रेल्वे, हवाई वाहतुकीवर तसंच रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. आज सकाळी दृश्यमानता अधिकच खराब असल्यानं इंदिरा

गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सुमारे १५० हून अधिक विमानांची उड्डाणं विलंबाने होत आहेत.

धुकं, थंडीचा कडाका आणि प्रदूषणामुळे दिल्लीतली हवा अतिशय वाईट स्तरावर पोहोचली आहे. उत्तर भारताच्या मैदानी भागात आज आणि उद्या दाट धुकं तर रविवारी पावसाची शक्यता असून तापमानात अधिक घट होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**जम्मू आणि काश्मीरमध्येही** थंडीची लाट कायम आहे. श्रीनगरमध्ये काल तापमान उणे ४ तर पहलगाम मध्ये उणे १० नोंदवण्यात आलं. इथंही पुढील काही दिवस थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. उद्या अनेक ठिकाणी ढगाळ हवामान राहणार असून मैदानी भागात पावसाच्या हलक्या सरी तर डोंगराळ भागात बर्फवृष्टीची शक्यता आहे.

**पंजाब, हरियाणा, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशासाठी** ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. **हिमाचल** प्रदेशातही उद्या आणि परवा पावसाची तसंच थंडीच्या लाटेची शक्यता वर्तवत हवामान विभागानं राज्याला यलो अलर्ट जारी केला आहे. डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी होऊन तापमानात अधिक घट होण्याची शक्यताही वर्तवली आहे. **बिहार, झारखंड, ओदिशा आणि ईशान्येकडील** राज्यांतही थंडीची लाट आणि घनदाट धुक्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**